# मी चंदा

सकाळचे साडेसात वाजले होते. चंदा रोज सकाळी सहा वाजता उठते. जुन्या सवयीनुसार चहा बिस्किटचा आस्वाद घेते. दिवसा करावयाच्या कामाचा अंदाज घेते. मग शुचिर्भूत होऊन देवीपुढे दिवा लावते, मस्तक टेकते. आता साडेसात ते साडेआठ तिचा `वेळ` असतो. तिची वर्तमानपत्रे तिची वाट बघत असतात. रोजच्या बातम्या, खास लेख, खास जहिराती, या सर्वांचा आढावा, खास आवडलेल्या लेखाचे वाचन या तासाभरात होते. रात्री झोपण्यापूर्वी शब्दकोडी हातावेगळी होतात. साडेआठ वाजल्यापासून मुले तिच्या बालक मंदिरात येऊ लागतात. या पुढचा दिवस ती मुलांमधे पूर्ण गुंतलेली असते. अगदी स्वागताला चंदाताई दिसली नाही तर मुले हिरमुसतात. या बालक मंदिराची ती प्रमुख आहे ज्यांचे आईबाबा नोकरीवर जातात व घरी सांभाळायला कोणी नाही अशी वय वर्षे चार ते पंधराची तीस पस्तीस मुले या बालक मंदिरात सोमवार ते शनिवार सकाळी साडेआठ ते संध्याकाळी साडेसात पर्यंत असतात. येताना ती आपला सकाळचा नाश्ता दुपारचे जेवण घेऊन येतात. आपापल्या वेळेप्रमाणे शाळेत जातात. संध्याकाळी मात्र त्यांना चंदाताईच्या हातचा खाऊ मिळतो. त्यांचा श्रमपरिहार होतो. चंदा त्यांच्यासाठी रोज नवे नवे मुलांना आवडेल असे काहीतरी बनवते. मुलेही खुष होतात. तिच्या मदतीला चार मदतनीस असतात त्यामुळे छोट्या मुलांना सांभाळणे सोपे जाते. या बालकमंदिराची मालकीण जिने हे पाळणाघर सुरु केले त्या सुमती पाटील आता निवृत्त होऊन लांबूनच देखरेख करतात.

या बालक मंदिराच्या स्थापनेची कथा पण जरा वेगळीच आहे. बाबुराव पाटील मोठे उद्योगपती, गावात त्यांचा मोठा वाडा. व्यवसाय वाढवून पैसे करण्यापेक्षा इतरांना व्यवसाय सुरु करुन देण्यात त्याना जास्त खुषी. समाज कार्याची आवड, त्यामुळे घरात उपरेच जास्त. त्यांना एकच मुलगा. त्याला इथले वातावरण आवडत नव्हते. त्याला पुणे मुंबईची ओढ होती. लग्न करुन तो पत्नीसह मुंबईला गेला. त्यांची पत्नी मुलगा लहान असताना वारली होती त्यामुळेच ते बाहेरच्या कामात व्यस्त असत. अचानक एक दिवस भयंकर बातमी आली मुलगा सुभाष अपघातात जागच्याजागी गेला. आयुष्य मिटून गेलेल्या सुमतीला सास-यांनी इथे आणली. तिच्याशी गोड बोलून तिला माणसात आणणे अवघड होते. मन सावरायला पदरी मूलही नव्हते. शेवटी त्यानी पाळणाघराची कल्पना तिच्या मनात भरवली. नोकरीवर जाणा-या आयांना त्यांच्या मुलांची किती काळजी असते. त्यांना घरकामाच्या नोकरावर सोपवून जावे लागते. त्यातून मुलांचे किती हाल होतात, किती अनर्थ घडतात ते तिला सांगून हे काम किती महत्वाचे, परोपकाराचे व चांगले आहे हे पटवून दिले. यात तिचा वेळ जाईल, मन रमेल व त्यांच्या पश्चात तिला आर्थिक विवंचना भासणार नाही. सुमतीला त्यांचे बोलणे पटले व हे बालक मंदिर सुरु झाले. जागा मोठी होतीच, त्यात सोयी केल्या. पगारी मदतनीस ठेवले. हे काम

सुरु झाले. एक दिवस विमनस्क मन:स्थितीत बसलेली चंदा त्याना देवळात दिसली. तिशीतली तरुणी एव्हढी निराश, विझलेल्या मनाच्या अवस्थेत पाहून त्यांना स्वत:चीच आठवण झाली. त्यांनी तिला घरी आणली. थोड्याच दिवसांत ती त्यांचा उजवा हात बनली. तिने बालक मंदिरात खूप सुधारणा केल्या. नवीन खेळ, खाऊ पध्दतशीरपणे सुरु केले. मुलांचा अभ्यास, त्यांचे शाळेचे होमवर्क यावर तिचे लक्ष असे. त्यामुळे पाळणाघराचे नाव झाले.

चंदा खोलीत गेली व तिने लोकसत्ता हातात घेतला. मुख्य बातम्या वाचता वाचता तिचे लक्ष एका बातमीकडे गेले. 'मनोरमा फडके यांचे निधन'. भारताच्या परराष्ट कचेरीत मोठ्या हुद्द्यावर असलेल्या, रशियन भाषा उत्तम जाणणा-या, राजकीय रशियन उच्च्यपदस्थ भारतभेटीला आले असता दुभाषा म्हणून उत्तम रितीने काम करणा-या एका कतृत्ववान विदुषीच्या निधनाने देशाचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. "अरे मनुताई वारली. काय झाले तिला?" चंदाच्या मनात विचार आला. शेजारच्याच पानावर दु;खद निधन अशा मथळ्याखाली तिला मनुताईचा फोटो दिसला. त्याखाली लिहिले होते, 'सौ मनोरमा फडके यांचे कॅन्सरच्या जिवघेण्या दुखण्याने अचानक निधन झाले. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.' खाली चैतन्य, सुधांषु, विश्वास फडके व आप्तजन असे लिहिले होते. त्याच पानावर दुस-या बाजुला एक जाहिरातवजा पत्र होते. "सुनीमा तू कुठे गेलीस? तुला खूप शोधले पण तू मिळाली नाहीस. तुला भेटायला आई तळमळत होती. तिने बाबांकडून तुझ्याशी लग्न करून तुला मानाने घरी आणायचे वचन घेतले आहे. आम्ही त्यावेळी तुला फार तोडून बोलून कृतघ्नतेने तुझा अपमान केला. तुझ्या आमच्यावरील प्रेमाची अवहेलना केली याबद्दल फार अपराधी व लाजिरवाणे वाटत आहे. कृपा करून तू कुठे आहेस ते कळव. तुला मानाने परत आणायला मी येतो. मी तुझी क्षमायाचना करतो. -चैतन्य.''

चंदाने त्या दोन्ही बातम्या वाचून डोळे मिटले. तिचा कंठ दाटून आला. डोळे पाणावले. तिचे दु;ख ती कोणाला दाखवू शकत नव्हती. ती सुनीमा म्हणजेच सुनंदा साठे दहा वर्षापूर्वीच मेली. आता आहे ती चंदा माटे, मुलांची चंदाताई. तिच्या डोळ्यासमोर दहा वर्षांपूर्वीचे चित्र दिसू लागले.

ते१९६२ साल होते. सुनंदा नुकतीच एस. एस. सी. झाली होती. दोन मोठे भाऊ, ही धाकटी बहीण व आई वडील असे त्यांचे पंचकोनी कुटुंब होते. मोठे दोघे कॉलेजमधे शिकत होते. हिला कॉलेजमधे जायची आवड नव्हती आणि वडिलाची तेव्हढी ऐपतही नव्हती. मोठा नोकरीच्या शोधात होता. हिला त्यावेळी म्युनिसिपालिटीत ओळखीने नोकरी मिळत होती पण तिला नोकरी करण्यात इंटरेस्ट नव्हता. घर सजवणे, आईला घरकामात मदत करणे, नवीन कलाकुसरीची कामे शिकणे यात ती रमत होती. अवघी सतरा वर्षाची पण उंच, गोरटेली, दाट, लांब केस, आंगापेराने चांगली उफाड्याची दिसत होती. एव्हढ्यात लग्न करणे योग्यही नव्हते व घरच्या परिस्थितीत शक्य नव्हते. दोन्ही भाऊ एकदोन

वर्षात मिळवते झाले की हिचे हात पिवळे करु असा आई बाबांचा विचार होता.

तिची आतेबहिण मनुताई तिला फार आवडे. दिसायला सुंदर, सुस्थळी पडलेली म्हणून मामामामींना पण तिचे कौतुक होते. तिचा नवरा विश्वास चांगला शिकलेला होता. त्याचा स्वत:चा व्यवसाय होता, गाडी होती. त्यावेळी स्वत:ची गाडी असणे मोठे अप्रूप होते. सुनंदाला तर तो सिनेमातला हिरोच वाटायचा. त्याचे बोलणे, पत्नीचे मामामामी म्हणून आईबाबांना मान देणे, येताना प्रत्येकासाठी काहीतरी खास आणणे याचे तिला अप्रूप वाटे. मनुताईला पण मामामामी व ही भावंडे फार आवडत. तिची आई ती लहान असताना गेली. मामीने तिचे लहानपणापासून आईच्या मायेने खूप लाड केले त्याचे तिला कौतुक व उपकार वाटत.

मनुताईला शिकण्याची फार आवड! ती इंग्लिश लिटरेचर घेऊन बीए झाली होती. त्याच वर्षी तिचे लग्न झाले. लग्नानंतर पाच वर्षात दोन मुलगे झाले त्यामुळे ती घरात अडकली. तसे घरात कामाला नोकर, स्वैपाकाला बाई होती पण बाहेर जाऊन नोकरी करणे किंवा कॉलेजला जाणे शक्य नव्हते. मोठा चैतन्य तीन वर्षाचा आणि धाकटा सुधांशु वर्षाचा झाला आणि तिने पार्ल्यात जवळच आहे म्हणून एक रशियन भाषा कोर्स जॉइन केला. त्यात ती पहिली आली. तिला त्या भाषेची गोडी लागली. तिने रशियन इन्स्टिट्युटला नाव नोंदवून प्रगत रशियन शिकायला सुरवात केली. वर्षभरात ती छान रशियन लिहू बोलू लागली. त्यांच्या फायनल परिक्षेत ती पहिली आली. तिला उच्च शिक्षणासाठी रशियन शिष्यवृत्ती मिळाली. मॉस्को युनिवर्सिटीत तिला एक वर्ष रहावे लागणार होते. तिथली डिग्री मिळाली की तिला रशियन वकिलातीत चांगल्या पदावर काम करता येणार होते. त्यावेळी रशिया भारताचा जवळचा मित्र होता त्यामुळे या गोष्टीला महत्व होते. मनुने मामीला सांगितले वर्षाचाच प्रश्न आहे घरी कामाला माणसे आहेत. विश्वासचेही मुलांकडे लक्ष असते पण तरिही त्यांना प्रेमाने बघणारे घरी कोणीतरी हवे. सासुबाईना विचारले त्यांनी हात वर केले. त्यांना धाकट्या मुलाची आणि त्या नातवंडांचीच काळजी जास्त. ती सून घरीच असते पण ती लहान आहे. तिला जमत नाही. मुलांची आबाळ होते अशा सबबी. काय करावे कळत नाही. असा चान्स सहसा मिळत नाही. मामीला मनुचे पहिल्यापासूनच कौतुक व प्रेम होते. ती म्हणाली अग ही सुनी आताच एस.एस.सी झाली आहे. तिला कॉलेजला जायचे नाही अणि नोकरी पण नाही करायची. तशी रिकामीच आहे. तिला तुझ्याबरोबर ने आणि सर्व दाखव. ती मुलांची छान काळजी घेईल. वर्षभराचा तर प्रश्न आहे. नाहीतरी तिच्या लग्नाचे आम्ही पुढच्या वर्षीच बघायचे ठरवले आहे. मनुताईचा प्रश्न सुटला. सुनंदाला पण आनंद झाला. कारण मनुताईचे पार्ल्याचे घर तिला आवडायचे. छोटासा बंगला पुढे मागे अंगण, घरात सुबत्ता, दारात गाडी. तिला तिच्यासाठी असेच घर हवे होते. थोडे दिवस अशा घरात रहायला मिळणार म्हणून ती खुष झाली.

सुनंदा मनुताईकडे आली आणि घरच्यासारखी होऊन गेली. तिने मुलाना छान लळा लावला. त्यांची शाळा, खाणे पिणे याकडे ती जातीने लक्ष देऊ लागली. मनोरमा मुलांच्या बाबतीत निश्चिंत होऊन रशियाला गेली. प्रथम वर्षासाठी गेलीली मनुताई तिथे दोन वर्षे राहिली. मधे एकदा आठवड्यासाठी येऊन गेली. सुनंदा सर्व घर व्यवस्थित सांभाळते आहे हे बघून खुश झली. सुनंदाची वृत्ती कलाप्रेमी होती. तिने घर आतून बाहेरून छान सजवले. खिडक्याना नवे पडदे, त्याना मॅचिंग बेडशीटस, कोप-यात फुलानी भरलेला फ्लॉवरपॉट, शोकेसमधे सुंदर शोपिसेस! घराचा नूरच तिने बदलून टाकला. शोभेची फुलझाडे, पान झाडे यानी पुढचे अंगण, तर गुलाब, शेवंती, जाईजुईच्या वेली यानी मागची बाग शोभिवंत व सुवासिक बनली. घरातील नोकर, माळी सर्वच तिच्यावर खुष होते. ती सर्वांशी आपलेपणाने वागून चांगले काम करून घेत होती. मुलाना तर आईची आठवण पण नव्हती. ती त्यांचे सर्व लाडकोड मायेने पुरवित होती.

एकदा चैतन्य आजारी पडला, चार पाच दिवस ताप उतरत नव्हता. चार रात्री सुनंदा रात्रभर त्याच्या उशाशी बसून होती. ताप वाढला तर मिठाच्या पाण्याच्या पट्ट्या कपाळावर ठेवत होती. पाचव्या दिवशी ताप उतरला आणि त्याला शांत झोप लागली आणि त्याच्या शेजारी बसलेल्या सुनंदालाही! विश्वास नेहमी प्रमाणे अर्ध्या रात्री चैतन्यला बघायला खोलीत आला. त्याने पाहिले की चैतन्याचा ताप उतरला आहे व तो शांत झोपला आहे. त्याने सुनंदाची अवघडलेली अवस्था पाहिली. त्याला तिची कणव आली. किती करते ही मुलांसाठी व घरासाठी! मनोरमेला हे जमले असते की नाही कोणजाणे ! त्याने तिला हलकेच दोन्ही हातानी उचलले व तिच्या खोलीत कॉटवर नेऊन झोपवले. गादीवर टेकताच सुनंदाला थोडी जाग आल्या सारखे झाले. त्याने तिला हळुवारपणे थोपटले. सुनंदा झोपेत कुशीवर वळली आणि अनवधानाने त्याच्या मिठीत शिरली. दोघांच्याही मनात काही नव्हते. तिचे नवतारुण्य व त्याचा  वर्षभराचा पत्नी विरह त्यामुळे दोघांच्याही नकळत नको ते घडले. जाग आल्यावर दोघेही एकमेकांच्या बाहुपाशात पाहून दोघेही चक्रावले. पण त्यानंतर त्या दोघात वेगळेच भावबंध निर्माण झाले. सुनंदाला पहिल्यापासूनच विश्वास हिरो वाटायचा. आता तिने त्याला आपला खराच हिरो मानला. थोड्या दिवसानी मनुताई रशियाहून परतली. सुनंदाने व विश्वासनेही त्यांच्यात काय घडले ते तिला मोकळेपणाने सांगितले. मनोरमाला तिचा अभ्यास व काम याचे महत्व जास्त असल्याने तिने त्यांच्या संबधाला हरकत घेतली नाही. सुनंदाने तिला मनापासून सांगितले की तिची जागा कधीच घेणार नाही पण आता ती दुस-या कोणाबरोबर जगू शकणार नाही. मनुताई आल्याबरोबर सुनंदाच्या आईवडिलांनी तिला घरी बोलावले. पण ती मुलांसाठी म्हणून चार दिवसात परत पारल्याला आली. तिच्यासाठी वर संशोधन सुरू झाले. पुष्कळ चांगली शिकलेली श्रीमंतांची स्थळे सुचवली. पण ती आपण लग्न करणार नाही यावर ठाम राहिली. नातेवाईकांनी, ओळखीच्यांनी, सर्वांनी तिच्यावर तसेच विश्वासवर आणि मनोरमावर टिकेची झोड उडवली पण ती आपल्या निश्चयावर कायम राहिली. मनुताई व विश्वासला तिचे कौतुक व अभिमान वाटला. तिने विश्वासवर मनापासून

प्रेम केले. त्या घरात ती पूर्ण रमून गेली. अशी दहा वर्षे गेली. घरातले उन्हाळे, पावसाळे, आनंदाचे प्रसंग, दुःखाचे आवेग या सर्वात ती सहभागी होऊन सर्वाचा भार तिने झेलला. मनुताईची नोकरी, बढती, प्रसिध्दी तिच्यामुळेच वाढली फोफावली. विश्वासनेही तिच्यावर प्रेम केले. तिला नवनवीन साड्या, दागिन्यांनी नटवले. सर्व ठिकाणी मनुबरोबर तिलाही नेले. बँकेत तिचा अकौंट उघडून तिला आर्थिक स्वतंत्रता दिली. सर्व छान चालले होते. मुले कॉलेजला जाऊ लागली होती. तिच्यापासून मोकळी होत होती.

अचानक विश्वासच्या धाकटया भावाची लंडनला बदली झाली. तो बँक ऑफ इंडियात ऑफिसर होता. तो आपल्या बायको मुलांना घेऊन लंडनला जाणार तेव्हा आजीची जबाबदारी विश्वासवर आली. त्याने ती नाकारण्याचा प्रश्नच नव्हता. पण आजीने चैतन्यला पट्टी पढवली. ती बया घरात आहे. तुझ्या बाबांशी तिचे बिनलग्नाचे संबंध आहेत. अशावेळी तुझ्याशी लग्न करायला कोण तयार होईल? कोण बाप तुला मुलगी द्द्यायला तयार होईल? तिला आधी  बाहेर काढ. मी तर ती असताना त्या घरात येणार नाही. माझे काय मी म्हातारी जाईन वृध्दाश्रमात. स्वतःचा मोठा मुलगा चांगला सुखवस्तु असताना आईने वृध्दाश्रमात जायचे म्हणजे लोकांच्या टिकेचे लक्ष्य होणे. ते कोणाला आवडणार? एव्हढी वर्षे ही छोटी मुले मोठी होताना, त्यांची आई परदेशी असताना त्याच्या आजारपणातही त्यांची विचारपूस न करणारी आजी आज चैतन्यला जवळची वाटली व तो जिने त्याचे मुलाच्या मायेने सर्व हट्ट् लाड पुरवले, अपराध पोटात घातले आईबाबांच्या रागापासून वाचवले त्या सुनीमाला तो वाटेल तसे बोलला. त्याचे वाक्ताडन चालू असताना विश्वास काहीच बोलला नाही. त्याने त्याला थांबवले नाही. मनुताईने जरा तोंड उघडण्याचा प्रयत्न केला पण तिला ते जमले नाही. तडातडा बोलून चैतन्य रागाने निघून गेला. मनुताईला रशियन गेस्टना रिसिव्ह करायला विमानतळावर लवकर पोचायचे होते त्यामुळे ती व तिला सोडायचे म्हणून विश्वास दोघेही पटकन निघाले. जाताना विश्वासने तिला सांगितले ’हे बघ आपला गोरेगावला फ्लॅट आहे तिथे एका खोलीत माझे ऑफिस आहे. बाकी सर्व रिकामाच आहे. मी तो छान पेंट करून घेतो आणि तुझी तिथे व्यवस्था करतो. आई आज उद्या येईल तेव्हा तू आजच दोनचार दिवसासाठी भावाकडे जा’. सुनंदा आपल्या खोलीत गेली. सर्व जग आपल्या भोवती फिरते आहे असे तिला वाटू लागले.

तिच्या मनात आले माझे तारुण्य मी या घरासठी दिले. लोकांच्या निंदानालस्तीची पर्वा न करता याच्यावर वेड्यासारखे प्रेम केले. कसली अपेक्षा ठेवली नाही. हेचि फल का मम प्रितीला? तिला आईची आठवण आली. दोन वर्षापूर्वी ती गेली. जाण्यापूर्वी ती एकदा हिला म्हणाली होती “अग बाळा तू त्याच्यावर खूप प्रेम करतेस पण तुझे त्याच्याशी नाते काय? हेबघ जसे हि-या मोत्याला जडावाचे कोंदण असते त्यामुळे ते उठून दिसतात, शोभून दिसतात. ते तसे नसले तर ते ओघळून जातात. नात्याचे पण तसेच असते. नात्याला नावाचे बंधन, कोंदण असावे लागते. नाहीतर तेही ओघळून

विस्कटून जाते.” त्यावेळी तिला त्याचा अर्थ लक्षात आला नव्हता. आता तिला ते जाणवले. तिने स्वत:शीच काही निर्णय घेतला. जरुरीच्या वस्तु व कपडे छोट्या बॅगमधे टाकले. थोडे पैसे घेतले आणि सरळ घराबाहेर पडली. दादर स्टेशनवर गेली. तिथे नुकतीच कोल्हापुरला जाणारी ट्रेन येत होती, त्याची उद्घोषणा तिच्या कानावर पडली. तिला वाटले आपल्याला महालक्ष्मीच बोलवते आहे. ती सरळ एका डब्यात जाऊन बसली. गाडी सुटली. जरा वेळाने टीसी आला. हिने त्याला सांगितले की काही अति महत्वाच्या कामासाठी मला अचानक कोल्हापूरला जावे लागत आहे. तिकिट काढायला वेळ नव्हता. तुमचा जो चार्ज असेल तो लावा व मला तिकिट द्या. टीसीला ते पटले त्याने तिला तिकिट व बर्थआरक्षण करून दिले. दुस-या दिवशी सकाळी ती कोल्हापुरला पोचली. तिने बाहेर येऊन रिक्षा केली व थेट देवळात गेली .देवळात शिरून गाभा-यासमोर एका पायरीवर बसून देवीला म्हणाली आई तुझ्या पायाशी आलेय.आता पर्यंत मनाला जे योग्य वाटले तशी वागले. मनाशी खोटेपणा केला नाही. माझे वागणे चुकीचे असेल तर मला क्षमा कर. पाप असेल तर पुण्याचा मार्ग दाखव. मी तुला शरण आले आहे. मला योग्य मार्ग दाखव. अणि ती डोळे मिटून घ्यान करत बसली.

कोणाच्या तरी खांद्याला झालेल्या स्पर्शाने तिला जाग आली. तिने वर बघितले. दोन शांत डोळे तिच्याकडे आईच्या मयेने पहात होते. ती उठली व तिने त्या बाईना नमस्कार केला. त्या म्हणाल्या तू अशी इथे का बसली आहेस? तुला कुठे जायचे आहे? सुनंदाने सांगितले की काही ठरवले नाही देवी आदेश देईल त्याप्रमाणे! मग त्या म्हणाल्या तू खूप थकलेली दिसतेस. मी इथे जवळच रहाते माझे घर मोठे आहे. मी तिथे पाळणाघर चालवते. माझ्या बरोबर आलीस व तुला मुलांच्यात रहायला आवडत असेल तर तू तिथे राहिलीस तरी चालेल. नसेल तर कुठेही जाऊ शकतेस. पण आता माझ्या बरोबर चल. ती त्या बाईबरोबर निघाली. वाटेत बरीच माणसे "सुमतीताई नमस्कार ! आज सकाळीच कशा देवळात?" असे विचारणारी भेटली त्यावरुन त्यांचे नाव सुमती आहे असे तिच्या लक्षात आले. घरी गेल्यावर सुमतीने तिला एका खोलीत नेले व सांगितले तुझे आन्हिक उरक, पाहिजे तर स्नान कर मी तुझ्यासाठी चहा करून आणते. ती बाथरुम मधून आंघोळ करून ताजीतवानी होऊन आली. चहा घेताना त्यानी विचारले तुझे नाव काय? तू कुठून आलीस? तिने ठरवले होते आता आपली जुनी ओळख पुसून टाकायची व नवे आयुष्य सुरु करायचे. तिने आपले नाव चंदा माटे असे सांगितले व पुढे म्हणाली मी मुंबईहून आले. आई बाबा गेले. तिकडे कोणी नाही आता इथेच काही उद्योग, नोकरी करून इथेच रहायची माझी इच्छा आहे. माझी महालक्ष्मीवर श्रध्दा आहे म्हणून मी इथे आले. थोड्या वेळाने मुले येऊ लागली. सुमतीताई त्यांचे स्वागत करू लागल्या. सुनंदाला पहिल्यापासून मुलांची आवड त्यामुळे इथे रहाणे आपल्याला सुखदायी होईल असे तिला वाटले. दुस-याच दिवशी तिने सुमतीताईना त्यांच्या कामात मदत करायला सुरवात केली. थोड्याच दिवसात त्या दोघींचे मायलेकीचे नाते दृढ झाले.

आता दहा वर्षानंतर यांना माझी आठवण झाली. मनुताई गेली तेव्हा आता मला पत्नीपद देऊन स्वताचा मोठेपणा वाढवणार. शिवाय गरजेला हक्काची बायको व मुलांना हक्काची आई! त्यावेळी माझ्या मनाचा विचार याच्या मनात आला नाही. मुलांची मी सुनीमा होते ते प्रेम त्यावेळी कुठे लोप पावले होते? नाही! आता त्या चक्रव्यूहात परत जाणे नाही. ती प्रेमवेडी सुनंदा कधीच मेली. आता मी फक्त चंदा आहे! चंदा माटे.तिने पेपर गुंडाळून बाजूला ठेवला व आपल्या मुलांचे स्वागत करायला ती बाहेर आली.

**--- नलिनी करंडे**